# वनविभाग
# नाशिक वनवृत्त

वन विभागातील नाशिक वनवृत्तातील (१) **लघुलेखक (निम्नश्रेणी)**(२) **लिपीक** (३) **वाहन चालक** पदावर अर्जाच्या दिनांकास नियुक्तीसाठी आवश्यक असलेली पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागात भरतीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवाराकडून ऑनलाईन **(online)** पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेच्या **http://forest.erecruitment.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहीत केलेले नमुना अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरिता विहित केलेली वेतनश्रेणी/शैक्षणिक अर्हता/अनुभव/शारीरिक पात्रता/वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल खालील प्रमाणे आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक १०/०९/२०१४ सांयकाळी ६.०० वाजेपावेतो स्विकारले जातील.

## १) पदांचा तपशील :- लघुलेखक (निम्न श्रेणी)

| सामाजिक आरक्षण | पद संख्या |
|---|---|
| खुला | २ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| सामाजिक आरक्षण/समांतर आरक्षण | महिला | माजी सैनिक |
|---|---|---|
| खुला | १ | १ |
| एकूण | १ | १ |

## २)पदांचा तपशील :- लिपीक

| सामाजिक आरक्षण | पद संख्या | |
|---|---|---|
| | सन २०१४ | सन २०१५ |
| अनुसूचित जाती | २ | १ |
| इतर मागास प्रवर्ग | १ | २ |
| शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | १ | ० |
| खुला | ६ | ० |
| एकूण | १० | ३ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

**(सन २०१४ करिता)**

| सामाजिक आरक्षण/ समांतर आरक्षण | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन | होम गार्ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| इतर मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| खुला | ४ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ६ |
| एकूण | ८ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १० |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

**(सन २०१५ करिता)**

| सामाजिक आरक्षण/ समांतर आरक्षण | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन | होम गार्ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इतर मागास प्रवर्ग | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकूण | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |

## ३)पदांचा तपशील :- वाहन चालक

| सामाजिक आरक्षण | पद संख्या | |
|---|---|---|
| | सन २०१४ | सन २०१५ |
| अनुसूचित जमाती | ० | १ |
| इतर मागास प्रवर्ग | २ | ० |
| खुला | ३ | ० |
| एकुण | ५ | १ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे. (सन २०१४ साठी)

| सामाजिक आरक्षण/ समांतर आरक्षण | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन | होमगार्ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इतर मागास प्रवर्ग | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| खुला | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| एकूण | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे. (सन २०१५ साठी)

| सामाजिक आरक्षण/ समांतर आरक्षण | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन | होमगार्ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

जाहिरातीत उल्लेख्र केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ४) पदाची वेतनश्रेणी

४.१ लघुलेखक (निम्न श्रेणी) : वेतन बँड ९३००-३४८०० ग्रेड वेतन - रु ४३००
४.२ लिपीक-नि-टंकलेखक : वेतन बँड ५२००-२०२०० ग्रेड वेतन - रु. १९००
४.३ वाहनचालक : वेतन बँड ५२००-२०२०० ग्रेड वेतन - रु. १९००

## ५) लघुलेखक (निम्न श्रेणी) पदाकरिता शैक्षणिक अर्हता

५.१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण केलेली आहे आणि

५.२ १०० शब्द प्रती मिनिट यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

५.३ इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रती मिनिट यापेक्षा कमी नाही किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रती मिनिट या पेक्षा कमी नाही इतक्या गतीची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेला असावा.

## ६) लिपीक-नि-टंकलेखक पदाकरिता शैक्षणिक अर्हता

६.१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण केली आहे आणि

६.२ मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रती मिनिट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रती मिनिट या गतीचे शासकीय वाणिज्य संस्थेचे प्रमाणपत्र धारण केलेला असावा.

## ७) वाहनचालक पदाकरिता शैक्षणिक अर्हता

७.१ मान्यताप्राप्त शाळेतून किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण झालेला.

७.२ मोटार वाहन कायदा १९३९ नुसार जड वाहन अथवा मोटार कार वा जीप चालविण्याचा परवाना धारक

७.३ मराठी व हिंदी भाषा बोलता येणे आवश्यक

७.४ जड वाहन अथवा मोटार कार वा जीप चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. निष्कलंक पुर्वाभिलेख व मोटार वाहन दुरुस्तीचे ज्ञान तसेच सुदृढ शरीरयष्टी व स्थानिक भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक.

८) **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दिनांक १०/०९/२०१४ रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

## ८.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. इतर आरक्षणासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली उच्च वयोमर्यादा.

## ९) लघुलेखक (निम्न श्रेणी) पदासाठी निवड प्रक्रीयेची कार्यपध्दती

९.१ लघुलेखक (निम्न श्रेणी) पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येवून उमेदवारांची निवड करण्यात येईल.

९.२ लघुलेखक (निम्न श्रेणी) पदासाठी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ३० गुण ठेवुन एकुण १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

९.३ परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्याची स्वरुपाच्या असतील, प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील.

९.४ लघुलेखक (निम्न श्रेणी) पद राज्यस्तरीय असल्याने निवड होणा-या उमेदवारांना राज्याचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे. यास्तव सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नप्रत्रिका तयार करतांना सदर बाब विचारात घेण्यात येईल.

९.५ जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल.

## १०) लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी निवड प्रक्रीयेची कार्यपध्दती

१०.१ लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी उमेदवाराची मौखिक परीक्षा न घेता लेखी परीक्षेच्या आधारे निवड करण्यात येईल.

१०.२ लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी निवड करतांना २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल, तसेच परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांचे आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची ्गुणवत्तेनूसार निवड करण्यात येईल.

१०.३ लिपीक-नि-टंकलेखक पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवुन एकुण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१०.४ परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्याची स्वरुपाच्या असतील, प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील.

१०.५ लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी निवड होणा-या उमेदवारांना संबधित जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवमान इ. स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे. यास्तव सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नप्रत्रिका तयार करतांना सदर बाब विचारात घेण्यात येईल.

१०.६ गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

## ११) <u>वाहनचालक पदासाठी निवड प्रक्रीयेची कार्यपध्दती</u>

वाहनचालक पदांसाठी १०० गुणांची व्यावसायिक चाचणी घेऊन उमेदवारांची निवड करण्यात येईल.

## १२) <u>निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-</u>

निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय रिक्त असलेल्या १० पदापर्यंत रिक्त असलेली पदे अधिक रिक्त पदाच्या ५० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश असेल. तसेच ११ ते ३० रिक्त पदाच्या संख्येच्या अनुषंगाने रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांच्या परंतु किमान ५ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करण्यात येईल.

अतिरिक्त उमेदवाराच्या संख्येची परिगणना करतांना उमेदवारांची संख्या अपूर्णांकांत येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यांत येईल.

## १३) <u>उमेदवारांना समान गुण मिळाल्यास:-</u>

**परीक्षे्चा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल:-**

**१)अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारक करणारे उमेदवार त्या नंतर**

**२) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचीत जमाती मधील नंतर अनुसूचित जाती,विशेष मागास प्रवर्ग, विमूक्त जाती ( १४ व तत्सम जाती,भटक्या जमाती जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) भटक्या जमाती (धनगर व तत्सम) ,इतर मागासवर्ग या क्रमाने त्यानंतर**

**३) शारीरिक दृष्टया अपंग असेलेले उमेदवार, त्यानंतर**

**४) माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर**

**५) स्वातंत्र सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर**

**६) वय ( वयाचे ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)**

**वरील प्रत्येक प्रमाणे संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.**

१४) **निवडसूचीची कालमर्यादा :-**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यन्तची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यन्त,जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यन्त विधिग्राहय ठरेल त्यानंतर निवडसूची व्यपगत होईल.

निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून जेष्ठतेनुसार उमेदवाराची नियुक्तीसाठी निवड केल्यानंतर निवड केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची नियुक्ती करण्यांत येईल.

**१५) निवड प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १(अ) | विविध प्रसार माध्यमातुन प्रसिध्दी देऊन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दिनांक १४/०८/२०१४ |
| (ब) | कार्यक्षेत्रात असलेल्या सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी कार्यालय/प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी जिल्हाधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड /अदिवासी प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन इच्छूक उमेदेवारांना रिक्त पदाची माहीती कळवून पत्र देणे | दिनांक २६/०८/२०१४ |
| (क) | विविध माध्यमातून अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक १०/०९/२०१४ |
| २ | प्राप्त अर्जाची तपासणी पूर्ण करण्याची अंतिम तारीख | दिनांक १७/०९/२०१४ |
| ३ | प्राप्त अर्जाची छाननी नंतर पात्र उमेदवारांची नांवे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २२/०९/२०१४ |
| ४ | लेखी परिक्षेचा दिनांक | दिनांक ५/१०/२०१४ |
| ५ | लेखी परिक्षेचा निकाल जाहीर करावयाचा दिनांक | दिनांक २०/१०/२०१४ |
| ६ | लघूलेखक (निम्नैणी) पदाची /वाहनचालक पदाची व्यावसायिक चाचणी /वाहन चालक पदाची शारिरीक क्षमता चाचणी | दिनांक २७/१०/२०१४ व २८/१०/२०१४ |
| ७ | निवड यादी तयार करुन जाहीर करणे | दिनांक २९/१०/२०१४ |
| ८ | निवड यादीतील उमेदवार यांची शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रांची तपासणी | दिनांक ३१/१०/२०१४ |
| ९ | i) नियुक्ती आदेश देण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करणे बाबत पत्र देण्याचा दिनांक<br>ii) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्याचा दिनांक | दिनांक १/११/२०१४<br>दिनांक १७/११/२०१४ |
| १० | सक्षम प्राधिकारी यांनी नेमणूकीचे आदेश देण्याचा दिनांक | दिनांक १८/११/२०१४ |

11. (i) लेखी परिक्षेचे स्थळ व वेळ :- संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
12. (ii) व्यावसायिक व शारिरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ. :-

याबाबत सुचना वेळोवेळी **http://forest.erecruitment.co.in** तसेच वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर देणेत येईल.

## १६) सर्वसाधारण अटी :-

१६.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

१६.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचे कायमचा रहिवासी असावा.

१६.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक.१३/०८/२०१४ अन्वये दिनांक १६/०३/१९९९ मधील परिच्छेद-५ मध्ये विहित करण्यांत आलेल्या कार्यपध्दती मध्ये मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणाचा समावेश करण्यांत आल्याने सदर परिपत्रकातील अ,ब,क नुसार सरळसेवेने नियुक्ती करतांना समांतर आरक्षण कार्यपध्दतीचा अवलंब केला जाईल.

१६.४ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६ /प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुण्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति/गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

१६.५ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६.६ मराठा आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमिलेयर) घटकांना लागू होणार नसल्याने,जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नाही अश्या उमेदवारांनी सामान्य न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सी.बी.सी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक दिनांक १५/०७/२०१४ च्या अनुषंगाने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६.७ विशेष मागास प्रवर्ग-अ आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमिलेयर) घटकांना लागू होणार नसल्याने,जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नाही अश्या उमेदवारांनी अल्पसंख्याक विकास विभाग,शासन निर्णय क्र.आविवि २०१४/प्रक्र.८१/का-७, दिनांक १९/०७/२०१४ च्या अनुषंगाने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

१६.८ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज सादर करावा.

१६.९ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज सादर करावा.

१६.१० अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

१६.११ पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

१६.१२ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

१६.१३ उमेदवारांना लेखी परिक्षा व व्यावसायिक चाचणी इ. करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

## १७) सेवाशुल्क :-

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बॅन्क शाखेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

| **प्रवर्ग** | **शुल्क** |
|---|---|
| खुला | ५०० |
| मागासवर्गीयांकरीता | २५० |
| माजी सैनिक | नाही |

## १८) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

| **अ.क्र.** | **कार्यक्रम** | **दिनांक** | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यत** |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | दि. १४/०८/२०१४ | दि. ०८/०९/२०१४ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बॅन्क ऑफ इंडीया एसबीआय यांचे शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | दि. १४/०८/२०१४ | दि. १०/०९/२०१४ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बॅन्केमध्ये दि. १०/०९/२०१४ पर्यत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि. १२/०९/२०१४ | |

(उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरीता विहीत केलेली वेतनश्रेणी/शैक्षणिक अर्हता/अनुभव शारीरिक पात्रता/वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल वर नमुद केलेप्रमाणे आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक १०/०९/२०१४ रोजी सायंकाळी ६.०० वाजपर्यत स्विकारले जातील.

## १९) अर्ज करण्याची पध्दत :-

१९.१ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना MKCL या संस्थेच्या http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCL यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

१९.२ उमेदवाराने उपरोक्त नमुद केलेल्या संकेतस्थळावर (website) Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registration) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

१९.३ नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form No.) व पासवर्ड (Password) काळजीपुर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपुन ठेवावा.

१९.४ त्यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

१९.५ या प्रिन्ट केलेल्या बँक चलनावर नमूद केलेली फि केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या कोणत्याही शाखेमध्ये दुस-या दिवशी तसेच वरील तक्त्यातील वेळापत्रकात नमुद केलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वत:कडे जपुन ठेवावी. अर्जाची फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

१९.६ बॅन्केत फि भरल्यानंतर दुस-या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज भरावा.

१९.७ उर्वरित अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत (Lattest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

१९.८ उमेदवाराने संपुर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेवून ती स्वत:जवळ ठेवावी

१९.९ वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया, उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर उमेदवार चाचणी / लेखी परिक्षेसाठी पात्र होईल.

१९.१० उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता मे.एम.के.सी.एल. यांच्या कॉल सेंटरवरील दुरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

१९.११ उमेदवारांना परिक्षेचे शुल्क एसबीआय व्यतिरिक्त डेबीट/क्रेडीट कार्ड अथवा नेट बँकींगव्दारे सुध्दा भरता येतील. त्यासाठी लागणारे सेवा शुल्क उमेदवाराने स्वत: भरावे.

## २०) महत्वाच्या सुचना

२०.१ पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने पाठवू नये.

२०.२ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे

आवश्यक आहे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. मुळ कागदपत्रे लेखी परिक्षेनंतर/व्यावसायिक चाचणीच्या वेळी तपासण्यासाठी सादर करणे आवश्यक राहील.

२०.३ गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेवून पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेच्या **http://forest.erecruitment.co.in** या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील.

२०.४ लघुलेखक (निम्नश्रेणी/लिपीक/वाहनचालक पदासाठी लेखी परिक्षा/व्यावसायिक चाचणीच्या वेळी उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक /समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

२०.५ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

२०.६ अर्ज एकदा ऑनलाईनव्दारे सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

## २१) भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-

२१.१ प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

२१.२ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

२१.३ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२१.४ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.

२१.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

२१.६ महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

२१.७ निवड झालेल्या उमेदवारांची वनवृत्ता अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रातील कार्यालयांत कोठेही नियुक्ती होऊ शकते.

२१.८ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

२१.९ नियुक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

२१.१० लघुलेखक (निम्नश्रेणी) पद राज्यस्तरीय पद असल्याने निवड झालेल्या उमेदवाराची नियूक्ती/बदली महाराष्ट्रात कुठेही होवू शकते याची उमेदवार यांनी नोद घ्यावी.

**सदस्य सचिव,**
**प्रादेशिक भरती प्रक्रीया समिती,नाशिक**
**तथा**
**उपवनसंरक्षक,पूर्व भाग,नाशिक**

परिशिष्ट -१ (ब)

**अर्जाचा नमुना**

| उमेदवाराने स्वत:चे अलीकडील साक्षांकित केलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

जाहिरात क्रमांक १ दिनांक /८/२०१४

अर्जदाराने कोणत्या प्रवर्गात अर्ज केला :- प्रवर्ग---------समांतर आरक्षण----------

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव :- -------------------

२. उमेदवारांचे पुर्ण नांव आडनांव नांव वडिलांचे /पतीचे नांव

मराठी ----------- ------------ -----------------

इंग्रजी ------------ ------------ -----------------

३. कायमचा पत्ता : ----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

४. पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता : - ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

पिन कोड क्रमांक | | | | | | | मोबाईल क्रमांक ----------------

५ अ. अर्जदार कोणत्या प्रवर्गातील आहे यापैकी लागू असलेल्या प्रवर्गासाठी ( √ ) अशी खुण संबंधित प्रवर्गाच्या रकाना करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास प्रवर्ग | विशेष मागास प्रवर्ग-अ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

५ (ब) जात (मागासवर्गीय असल्यास जात/पोटजात व प्रवर्ग जाती किंवा वैधता प्रमाणपत्रानुसार) नमूद करावी.

६ राष्ट्रीयत्व

७ महाराष्ट्र राज्याचे कायमचे रहिवासी आहात काय? होय / नाही

८ उमेदवार पुरुष किंवा स्त्री आहे पुरुष / स्त्री

९ अ उमेदवार उन्नत व प्रगत (क्रिमीलेयर) गटामधील आहे काय? होय / नाही

९ ब उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र आहे काय. होय / नाही

१० उमेदवार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त आहे कांय होय / नाही

११ उमेदवार स्वातंत्र सैनिकाचा पाल्य आहे कांय होय / नाही

१२ उमेदवार अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू आहे कांय होय / नाही

१३ अ उमेदवार माजी सैनिक आहे काय होय / नाही

१३ ब उमेदवार लष्करी कार्यवाहीत मृत्यू पावलेल्या कुटुंबियापैकी आहे कांय होय / नाही

१३ क उमेदवार १९७७.७९ साली झालेल्या शासकिय कर्मचा-यांच्या संपकाळात तात्पुरती नियुक्ती केलेला व सध्या बेरोजगार असलेला संपकालीन कर्मचारी आहे कांय होय / नाही

१४ जन्मतारीख (शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार) दिनांक -- महिना -- वर्ष ---

१५ दिनांक १० /०९/२०१४ रोजीचे वय -- वर्ष-- महिना -- दिवस --

(दिनांक १० /०९/२०१४ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण झालेला तथापी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावा मागासवर्गीयांना शिथीलक्षम)

१६ जन्म ठिकाण : गांव/शहर -- जिल्हा -- राज्य --

१७ मातृभाषा व इतर भाषेचे ज्ञान::- अवगत असलेली भाषा

१८. शैक्षणिक अर्हता किंवा तत्सम परिक्षेपासुन उत्तीर्ण सर्व परिक्षेचा तपशील

| अ.क्र | परीक्षेचे नांव | शाळेचे/बोर्डाचे/विद्यापीठाचे /संस्थेचेनांव | विषय | परिक्षेत मिळालेले गुण | टक्केवारी | परीक्षा उतीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मान्यता प्राप्त शाळेतुन ४ थी उत्तीर्ण | | | | | |
| २ | माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| ३ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| ४ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी | | | | | |
| ५ | पदयुत्तर | | | | | |
| ६ | इतर | | | | | |

१९. लघुलेखक (निम्नश्रेणी) पदासाठी मान्यता प्राप्त संस्थेचे पाठयक्रम प्रमाणपत्र आहे काय ? होय/ नाही

१९.१.संगणक प्रशिक्षित आहात काय?(शासन मान्य एम.एस.सी.आय.टी.) होय/ नाही

२०. अनुभव प्राप्त असल्यास त्याचा तपशील

२१. पूर्वी आणि सध्या करीत असलेल्या नोकरीचा तपशील

| कार्यालयाचे/ विभागाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | वेतनश्रेणी | स्थायी किंवा तात्पुरती | रुजू झाल्याची तारीख | नोकरी सोडली संपली असल्यास/ दिनांक व सोडण्याची कारणे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

२२. (अ) आदिवासी प्रकल्प अधिकारी / सेवा आयोजन कार्यालय / समाजकल्याण कार्यालय/जिल्हाधिकारी यांच्याकडे नांव नोंदणी केली आहे काय ? होय / नाही

(ब)नांव नोंदणी केले असल्यास नोंदणीचे ठिकाण नोंदणी क्रमांक, नोंदणी वर्ष.

नोंदणीचे ठिकाण ---------

नोंदणी क्रमांक ---------

नोंदणी वर्ष ---------

(क) नुतनिकरणाचा दिनांक : ___________________________

२३. लागू असलेल्या बाबीवर ( √ ) अशी खुण करावी

अ) विवाहित / अविवाहित

ब) विधुर /विधवा/ लागू नाही

क) विवाहित असल्यास मुला-मुलीची संख्या

| | | |
|---|---|---|
| २४(अ) | फौजदारी प्रकरण पोलीस/ न्यायालयात दाखल किंवा प्रलंबित आहे काय ? | होय/नाही |
| २४(ब) | दिवाणी प्रकरण न्यायालयात/प्राधिकरणात प्रलंबित आहे काय ? | होय/नाही |
| २५. | अर्जादाराकडे खालील कागदपत्रे आहेत काय ? | होय/नाही |
| १ | शालांत परीक्षा प्रमाणपत्र (जन्मतारखेच्यादाखल्यासाठी) आहे काय ? | होय/नाही |
| २ | प्राथमिक शाळा/एस.एस.सी/ एच.एस.सी/पदविधर/पदयुत्तर गुणपत्रक आहे काय ? | होय/नाही<br>होय/नाही |
| ३ | जातीचे प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |
| ४ | जात वैधता प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |
| ५ | उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |

## उमेदवाराचे स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो/करते की वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. नमूद केलेल्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्यल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**अर्जदाराची सही**

दिनांक :

**नांव:-**

ठिकाण :

# लहान कुटूंबासंबंधी प्रतिज्ञापत्र

**नमूना - अ**

**(नियम - ४)**

मी श्री / श्रीमती / कुमारी -----------------------------------------------------------श्री ----------------------- यांचा /यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय --------- वर्ष -------राहणार ------------------------------ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी -------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ---------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८-३-२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --- आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक २८-३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास बाध्य होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :-

**नांव:-**

## ओळखपत्र (दोन प्रतीत)

अर्जावर चिकटवलेले छायाचित्र

१. उमेदवार क्रमांक -----------

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव -------------------------------

३. ज्या पदाकरिता अर्ज केला असेल त्या पदाचे नांव -----------------

# नाशिक वनवृत्त

## सरळसेवा भरती (संक्षिप्त जाहिरात)कक्ष-१/आस्था/ /२०१४.१५ दिनांक १३.८.२०१४

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे आस्थापनेवरील नाशिक वनवृत्तातील लघूलेखक(निम्नश्रेणी),लिपिक, वनरक्षक, वाहन चालक या संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्यादित (MKCL) यांचे मार्फत खालील विवरणात नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांकडून सदर जहिरातीद्वारे दिनांक १०/०९/२०१४ पावेतो सायंकाळी ६.०० वाजेपावेतो फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

| पदाचे नाव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता | भरावयाची एकूण पदे |
|---|---|---|
| **१)लघू टंकलेखक-निम्नश्रेणी(गट-क)** ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी) उत्तीर्ण केलेली आहे<br>२)१०० शब्द प्रती मिनिट यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>३) इंग्रजी टंकलेखानाचे वेग ४० शब्द प्रती मिनिट यापेक्षा कमी नाही किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रतीमिनिट या पेक्षा कमी नाही इतक्या गतीची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेला असावा. | २ पदे |
| **२) वनरक्षक (गट क)** वेतन बॅड५२००-२०२०० ग्रेड वेतन १८०० | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा गणित विषयासह किंवा विज्ञान व गणित विषयासह उत्तीर्ण केलेली असावा. | १०३ |
| **३) लिपिक-नि-टंकलेखक (गट क)** वेतन बॅड५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी( उत्तीर्ण केली आहे.<br>२) मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी टंकलेखनाचा ४० शब्द प्रति मिनीट या गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेला असावा. | १३ |
| **४) वाहन चालक (गट क)** वेतन बॅड५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | १) मान्यता प्राप्त शाळेतून किमान इयत्ता ४ उत्तीर्ण झालेला असावा.<br>२) मोटार वाहन कायदा १९३९ नुसार जड वाहन अथवा मोटार कार/जीप चालविण्याचा परवाना धारक असावा. | ६ |

भरावयाच्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील पदासाठी सविस्तर जाहिरात अर्हता,वयोमर्यादा,सामाजिक व समांतर आरक्षण, विहित शल्क,अर्ज करावयाची पध्दत, विविध महत्वाचे दिनांक, परीक्षेबाबतची माहिती व इतर सूचना सविस्तरपणे **http://forest.erecruitment.co.in** आणि **www.mahforest.gov.in** या संकेत स्थळावर दिनांक १४/०८/२०१४ रोजी सायंकाळी पासून उपलब्ध आहे.

स्थळ:- नाशिक
दिनांक १३/०८/२०१४

सदस्य सचिव,
प्रादेशिक भरती प्रक्रीया समिती,नाशिक
तथा
उपवनसंरक्षक,पूर्व भाग,नाशिक